दिनांक ०९/०२/२०२० रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने " **BEST CONVICTION OF THE MONTH** " माहे डिसेंबर—२०१९ या याकरीता खाली नमुद पोलीस ठाणेची निवड करण्यात आलेली आहे.

## ब) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ डिसेंबर — २०१९

| | | |
|---|---|---|
| **०१** | **आग्रीपाडा पो. ठाणे परिमंडळ—३** | **गु.र.क्र. ९६/१८ कलम ३७६ (२)(आय) (जे) (के) भादवि सह ४,६,८,९(एम) १०, १२ पोक्सो कायदा.** |

**—: अल्पवयीन मुलीवर लैगीक अत्याचारः—**

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत**:— यातील नमुद तारीख वेळी व ठिकाणी आरोपी धोंडुराम भिकु तांबे वय ६३ वर्षे, याने जानेवारी २०१८ ते दिनांक १८/०४/१८ या काळात बळीत मुलगी अमृता नांदगांवकर, वय ११ वर्षे ही अल्पवयीन असल्याची जाणीव असताना वेळोवेळी तिची छाती दाबली. तसेच ती संमती देण्यास समक्ष नसताना तिचे इच्छेविरूदध जबरीने तिचे योनी मार्गात त्यांची बोटे घुसवुन बळीत मुलीचा बलात्कार करून लैंगिक अत्याचार केला म्हणून गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | सौ.दिपाली केदारनाथ साळुंखे, वय २६ वर्षे, |
| बळीत/मयत | :— | अमृता नांदगांवकर, वय ११ वर्षे |
| आरोपी अटक व दिनांक | :— | धोंडुराम भिकु तांबे, वय ६३ वर्षे,<br>अटक १९/०४/२०१८. |
| निकाल दिनांक | :— | ०३/१२/२०१९. |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | १) पोक्सो कलम ६ मध्ये २० वर्षे, सक्तमजूरी व रू.२०,०००/— दंड व दंड न भरल्यास ३ महिने सक्तमजूरी.<br>२) पोक्सो कलम १० मध्ये ५ वर्षे सक्तमजूरी व रू. १०,०००/—दंड व दंड न भरल्यास २ महिने सक्तमजूरी.<br>३) पोक्सो कलम १२ मध्ये ३ वर्षे सक्तमजूरी व रू.५०००/— दंड व दंड न भरल्यास १ महिना सक्तमजूरी. |

**तपास कौशल्य**:— गुन्हा दाखल झाल्यानंतर तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सावळराम आगवणे, आग्रीपाडा पोलीस ठाणे यांनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हयाचा तपास सुरू केला. प्रथम तपासी अधिकारी म.पो.उ.नि. यास्मीन मुल्ला यांनी नमुद गुन्हा नोंद केला. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक शक्ती प्रसाद थोरात यांनी करुन त्याच दिवशी गुन्हयातील आरोपीस अटक केली.

तपासी अधिकारी पो.नि.थोरात यांनी न्याय वैद्यकिय अहवाल प्राप्त करून कागदपत्रांची जुळवणी केली व विहीत वेळेत दोषारोपपत्र दाखल केले. केसच्या सुनावणी दरम्यान पैरवी अधिकारी व न्यायालयीन काम पाहणारे अंमलदार यांनी न्यायालयात तारखेस स्वत: उपस्थित राहून साक्षीदार व तपासी अधिकारी यांना मा.न्यायालयात वेळोवेळी उपस्थित ठेवले. तसेच पंच व साक्षीदार यांना गुन्हयाच्या अनुषंगाने योग्यप्रकारे ब्रिफींग करून मा. न्यायालयात यशस्वीरित्या साक्ष पुर्ण केली.

सदर गुन्हयाच्या तपासामध्ये तसेच न्यायालयीन प्रक्रीयेमध्ये तपास पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी त्यांचे कर्तव्य चोखपणे बजाविल्याने सदरचा गुन्हा दोषसिध्द झाला.

आग्रीपाडा पोलीस ठाणे पथकातील तपासी अधिकारी व अंमलदाराचे नावे खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | व.पो.नि. | सावळाराम आगवणे | प्रशस्तीपत्रक |
| २ | पोलीस निरीक्षक | शक्तीप्रसाद थोरात | प्रशस्तीपत्रक |
| ३ | पोलीस उप निरीक्षक | यास्मीन मुल्ला | प्रशस्तीपत्रक |
| ४ | पोलीस उप निरीक्षक | मधुकर शंकर साळवी | प्रशस्तीपत्रक |
| ५ | पो.ना.क्र. ३३७५४ | विकास चांगदेव पाटील | प्रशस्तीपत्रक |
| ६ | म.पो.ना.क्र. ९८०५६४ | संजना संजय दुखंडे | प्रशस्तीपत्रक |
| ७ | पो.ना.क्र. ०५०१९९ | लवेश सखाराम पुळेकर | प्रशस्तीपत्रक |